सत्यमेव जयते

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

**STATE COMMON ENTRANCE TEST CELL, MAHARASHTRA STATE, MUMBAI**

8th Floor, New Excelsior Building, A. K. Nayak Marg, Fort, Mumbai-400001. (M.S.)

E-mail - maharashtra.cetcell@gmail.com Website - www.mahacet.org Phone - **022-22016157/59/53/34/19/28**

MHT-CET-2019/Updated Notice No. 4 Practice Test /2019/891 Date: 04/04/2019

# अद्ययावत सूचना - 4: - एमएचटी सीईटी – सराव परीक्षा - 2019

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांनी, विभागाच्या आणि प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या परवानगीने एमएचटी सीईटी 2019 ही परीक्षा दहा दिवसांच्या कालावधीमध्ये 2 मे, २०१९ ते 13 मे, २०१९ ह्या कालावधीत विविध सत्रांमध्ये ऑन लाइन संगणक पद्धतीने राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये संगणक व इतर अनुषंगिक सुविधांच्या उपलब्धतेनुसार आयोजित केलेली आहे.

विद्यार्थ्यांना ऑनलाइन संगणक आधारित चाचणीचा अनुभव देण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परिक्ष कक्ष, महाराष्ट्र राज्य, **एमएचटी सीईटी – सराव परिक्षा – 2019** आयोजित करीत आहे.

**<u>एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019 देताना उमेदवाराने खालील बाबींची नोंद घ्यावी.</u>**

- उमेदवाराने **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019 ही** www.mahacet.org ह्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झालेल्या वेळापत्रकानुसार देणे बंधनकारक राहील.
- उमेदवारांने रु. 25 मात्र (रूपये पंचवीस मात्र) त्याने निवडलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षेच्या आधी रोख जमा करावे.
- उमेदवाराने सदर परीक्षेकरीता, स्वतःचा पूर्णपणे चार्ज केलेला स्मार्टफोन घेऊन जावा.
- ऑन लाइन संगणक आधारित चाचणीचा अनुभव देण्यासाठी **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** आयोजित करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.
- सदर परीक्षा प्रामुख्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी केंद्रिभुत मानून आयोजित केलेली आहे.
- **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** मधील प्रश्न, त्यांची खोली, प्रमाण आणि काठीण्य पातळी ही दहा दिवसांच्या कालावधीमध्ये 2 मे, २०१९ ते 13 मे, २०१९ ह्या दरम्यान विविध सत्रांमध्ये आयोजित केल्या जाणाऱ्या अंतिम एमएचटी-सीईटी 2019 ऑनलाइन परीक्षेशी जुळणार नाही याची उमेदवाराने गाम्भिर्यपुर्वक नोंद घ्यावी.
- ऑनलाईन अर्जातील सूचना आणि घोषणापत्र वाचून उमेदवाराने **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** चा अर्ज भरावा. अर्ज भरणांया उमेदवाराने सर्व सुचना आणि घोषणापत्र व्यवस्थित वाचले आहे आणि ते संबंधित उमेदवारास मान्य आहे असे समजण्यात येईल.

**एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019 साठी, परीक्षा पेपरचा नमुना खालीलप्रमाणे असेल:**

| प्रश्नसंच | विषय | मल्टिपल चॉइस प्रश्नांची (एमसीक्यू) अंदाजे संख्या | | गुण प्रति प्रश्न | एकूण गुण | परीक्षेचा कालावधी ( मिनीटे ) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Std. XI | Std. XII | | | |
| भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित (PCM) | गणित | 2 | 8 | 2 | 50 | 45 |
| | भौतिकशास्त्र | 3 | 12 | 1 | | |
| | रसायनशास्त्र | 3 | 12 | | | |
| भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB) | जीवशास्त्र (वनस्पतीशास्त्र) | 1 | 9 | 1 | 50 | 45 |
| | जीवशास्त्र (प्राणीशास्त्र) | 1 | 9 | | | |
| | भौतिकशास्त्र | 3 | 12 | | | |
| | रसायनशास्त्र | 3 | 12 | | | |

- **एमएचटी सीईटी – सराव परिक्षा – 2019** साठी उमेदवाराने बारावीच्या (HSC) परीक्षेचे मूळ हॉल तिकीट सोबत आणणे आवश्यक आहे.
- परीक्षेसाठी अर्ज करताना उमेदवाराकडे बारावीच्या (HSC) परीक्षेचा हॉल तिकीट क्रमांक असणे आवश्यक आहे.
- सराव परीक्षा सुरू करण्यापूर्वी उमेदवारास परिक्षा सुरू करण्यासाठी पासवर्ड परीक्षा कक्षामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. उमेदवराने स्वत:च्या बारावीच्या (HSC) परिक्षेच्या हॉल तिकीट क्रमांकाची आणि दिलेल्या पासवर्डची गोपनीयता राखणे अत्यंत आवश्यक आहे. ही पूर्णपणे उमेदवाराची जबाबदारी राहील.
- परीक्षेदरम्यान मोबाईलवर लॉगईन केल्यानंतर, परीक्षेसाठी त्याला **प्रश्नसंच भौतिकशास्त्र, रशायनशास्त्र, गणित (PCM – पीसीएम)** किंवा **भौतिकशास्त्र, रशायनशास्त्र, जीवशास्त्र (PCB – पीसीबी)** यापैकी केवळ एक प्रश्नसंच निवडावा लागेल.
- उमेदवाराने आपल्यासोबत बॉल पॉईंट पेन आणावा. कच्च्या कामासाठी कोरा कागद उमेदवाराला परीक्षा केंद्रावर दिला जाईल.
- उमेदवाराने नियोजित दिवशी किमान 30 मिनिटे अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. परीक्षेचा दिनांक व वेळ व परीक्षा केंद्र या बाबत उमेदवारास एस. एम. एस. किंवा ईमेलद्वारे सुचित करण्यात येईल.
- परीक्षाकेंद्रावर उशिरा येणाऱ्या उमेदवारांना **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** साठी उपस्थित राहण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि त्यासाठी उमेदवार स्वत: जबाबदार असेल.

**टीपः**

- **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** नोंदणीसाठीचा अर्ज 10 एप्रिल, 201 9 (11.59 वाजे) पर्यंत खुला राहील.

- विविध परिक्षा केंद्रांवर 12 एप्रिल ते 30 एप्रिल, २०१९ या कालावधीत **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** घेण्यात येईल.

- नोंदणीकृत उमेदवारांना 11 एप्रिल, 2019 रोजी एसएमएस किंवा ई-मेलद्वारे त्यांच्या **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** च्या चाचणीची वेळ, तारीख आणि परीक्षा केंद्र याबाबत ई मेल किंवा एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.

- **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** परीक्षेची व्यवस्था करण्याची जबाबदारी संबंधित परिक्षा केंद्र असणांया संस्थेवर आहे.

- **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** परिक्षा आयोजित करण्याची जबाबदारी **Ms. OFFEE** यांच्यावर आहे.

- राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, फक्त नमुना प्रश्नसंच उपलब्ध करून देणार आहे.

- ह्या **एमएचटी सीईटी – सराव परीक्षा – 2019** परीक्षेव्यतिरिक्त राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत **TCS iON Prep 4 EXAM** ही ऑनलाईन चाचणी उमेदवारास रु. 118 / - भरून घरबसल्या देता येईल.

स्वा

आयुक्त

राज्य सामाईक प्रवेश

परिक्षा कक्ष